सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य**
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३५६, ४६५, ४९२, ४४२
ई-मेल - desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://dte.maharashtra.gov.in

क्रमांक: २/एनजीसी/प्रवेश प्रक्रिया सूचना/२०२६/ ८०२ दिनांक : 25 AUG 2026

परिपत्रक

विषय : तंत्रशिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमांच्या संस्था स्तरावरील व CAP फेऱ्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत सर्व संबंधित संस्था, विद्यार्थी व पालकांसाठी सूचना..

संदर्भ : मा.आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांची सूचना क्र.तशि प्र १२२६/प्र क्र ७/प्रवेश प्रक्रिया/२०२६/२०६१, दि.२१.८.२०२६

या संचालनालयाच्या अधिपत्याखालील येणाऱ्या सर्व तांत्रिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थामध्ये संस्था स्तरावरील व केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी सर्व संबंधित संस्था, विद्यार्थी व पालकांसाठी संदर्भीय परिपत्रकानुसार सूचना जाहीर केलेल्या आहेत. सोबत प्रत जोडण्यात येत आहे.

त्यास अनुसरून सर्व तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत असलेल्या पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना, विद्यार्थ्यांना व पालकांना कळविण्यात येते की, संस्था स्तरावरील व केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये पारदर्शकता, गुणवत्ता व नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी जाहीर केलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

(डॉ.प्रमोद नाईक)
प्र.संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिएर बिल्डींग, ए के नायक मार्ग, मुंबई ४०० ००१ यांना माहितीसाठी सादर

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

१)सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर त्यांना कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील, आपल्या विभागांतर्गत असलेल्या सर्व संबंधित संस्थांच्या निदर्शनास आणुन दयावे आणि आपल्या कार्यालयाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात यावे.

२)कार्यासन क्रमांक : ३

महाराष्ट्र शासन
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

**क्र. तशि प्र १२२६/प्र क्र ७/प्रवेश प्रक्रिया/२०२६/२०६१** **दिनांक २१/०८/२०२६**

# *जाहीर सूचना*

**तंत्रशिक्षण विभागाअंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमांच्या संस्थास्तरावरील व CAP फेऱ्यांनंतर रिक्त राहिलेल्या जागांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत सर्व संबंधित संस्था, विद्यार्थी व पालकांसाठी सूचना**

- महाविद्यालयांनी माहिती पुस्तिकेतील नियम १३ (Rule 13) नुसारच संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रिया राबवणे बंधनकारक आहे.
- संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रिया सर्व CAP फेऱ्या पूर्ण झाल्यानंतरच आणि अर्जदारांच्या 'Inter-Se-Merit'नुसार करण्यात यावी.
- महाविद्यालयांनी संस्थास्तरावरील प्रवेशाचे नियम, प्रक्रिया व माहिती पुस्तिका (Prospectus) आपल्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे अनिवार्य आहे.
- इच्छुक उमेदवार संबंधित महाविद्यालयात थेट अर्ज करू शकतात. तसेच, थेट अर्ज करणे शक्य नसल्यास उमेदवार आपल्या CAP पोर्टल लॉगिनद्वारे संस्थास्तरावरील 'Option Form' भरू शकतात.
- संस्थास्तरावरील प्रवेशासाठी प्राप्त अर्ज तसेच CET कक्षाकडून उपलब्ध करून देण्यात आलेली विद्यार्थ्यांची यादी विचारात घेऊन महाविद्यालयाने अधिकृत गुणवत्ता यादी (Merit List) तयार करून ती नोटीस बोर्डावर व अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे अनिवार्य आहे.
- विद्यार्थ्यांचा संस्थास्तरावरील प्रवेश निश्चित झाल्यानंतर महाविद्यालयाने त्याची नोंद CAP पोर्टलवर तात्काळ करणे बंधनकारक आहे.
- CAP फेऱ्या पूर्ण होण्यापूर्वी कोणत्याही एजंट, मध्यस्थ किंवा जागा मिळवून देण्याचा दावा करणाऱ्या व्यक्तींच्या आमिषाला विद्यार्थी व पालकांनी बळी पडू नये.
- सोशल मीडिया लिंक, एजंट किंवा खाजगी समुपदेशकांमार्फत प्रसारित होणाऱ्या खोट्या व दिशाभूल करणाऱ्या माहितीपासून सावध राहावे.
- कोणत्याही अफवा किंवा अनधिकृत माहितीवर विश्वास ठेवू नये. प्रवेश प्रक्रियेबाबतची माहिती फक्त CET कक्षाच्या अथवा संबंधित संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावरूनच तपासावी.

प्रवेश प्रक्रियेतील पारदर्शकता, गुणवत्ता व नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी सर्व संबंधित संस्था, विद्यार्थी व पालकांनी वरील सूचनांचे पालन करावे.

सही/-

**(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)**

**आयुक्त**

**महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा**

**(सीईटी) कक्ष, मुंबई**